खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ

## **हुतात्मा राजगुरू महाविद्यालय राजगुरुनगर**

## **अर्थशास्त्र विभाग**

## **शैक्षणिक अहवाल 2025 – 2026**

शैक्षणिक वर्ष 2025 – 2026 मधील अर्थशास्त्र विभागाच्या वतीने विविध उपक्रम आयोजित करण्यात आले. त्या सर्व उपक्रमाचा संक्षिप्त अहवाल खालील प्रमाणे देत आहोत.

1) द्वितीय वर्ष अर्थशास्त्र विषय घेतलेल्या विद्यार्थ्यांचे **स्वागत समारंभ आयोजित १४ ऑगस्ट २०२५** करण्यात आले याप्रसंगी टी. वाय. बी. ए अर्थशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांनी द्वितीय वर्षात अर्थशास्त्र विषय घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत गुलाबचे पुष्प देऊन केले.

2) **दिनांक 10 सप्टेंबर 2025** रोजी अर्थशास्त्र विभागातर्फे **"फिल्ड व्हिजिट"** या विषयांतर्गत क्षेत्रभेटीचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून आर्थिक घडामोडी, पर्यटनाशी संबंधित व्यवसाय आणि स्थानिक अर्थव्यवस्था यांचा अभ्यास करण्याची संधी उपलब्ध करून देणे हा होता. क्षेत्रभेटी अंतर्गत विद्यार्थ्यांनी नाणेघाट, शिवनेरी, ओझर आणि लेण्याद्री या ऐतिहासिक व पर्यटनस्थळांना भेट दिली. भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी पर्यटक आणि स्थानिक व्यावसायिकांच्या मुलाखती घेतल्या. त्यांच्याशी संवाद साधत पर्यटनामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेत होणारा बदल, रोजगारनिर्मिती आणि व्यावसायिक संधी याबद्दल माहिती गोळा केली. या क्षेत्रभेटीमुळे विद्यार्थ्यांना व्यावहारिक अनुभव, संशोधन वृत्ती, आणि सामाजिक व आर्थिक जाणिवा विकसित करण्याची मौल्यवान संधी मिळाली.

3) **१२/०९/२०२५ ते १४/०९/२०२५** या दरम्यान अर्थशास्त्र विभागातर्फे **सेमिनारचे** आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये अर्थशास्त्र विषयाची गोडी निर्माण करणे, सादरीकरण कौशल्य वाढविणे आणि विचारप्रवृत्ती विकसित करणे हा होता. या सेमिनारमध्ये एफ.वाय.बी.कॉम, एस.वाय.बी.कॉम, टी.वाय.बी.कॉम, तसेच एस.वाय.बी.ए. आणि टी.वाय.बी.ए. या वर्गातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांना वेगळे विषय देऊन त्या विषयांवर स्वतःचे विचार मांडण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले.

4) **दिनांक 13 ऑक्टोबर 2025** रोजी जागतिक अर्थशास्त्र दिनाचे औचित्य साधून अर्थशास्त्र विभागातर्फे **"प्रश्नमंजुषा स्पर्धा"** आयोजित करण्यात आली. या कार्यक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांचे अर्थशास्त्र विषयावरील ज्ञान वाढविणे, विषयाची गोडी निर्माण करणे, तसेच अर्थशास्त्रीय विचारसरणी विकसित करणे हा होता. या उपक्रमामध्ये एस.वाय.बी.ए. वर्गातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांना विविध अर्थशास्त्र, अर्थव्यवस्था,

चालू घडामोडी आणि सामान्य ज्ञानाशी संबंधित प्रश्न विचारण्यात आले. स्पर्धेदरम्यान विद्यार्थ्यांनी उत्तम प्रतिसाद दिला आणि उत्साहाने सहभाग घेतला.

5) **दि. 20 नोव्हेंबर 2025** रोजी **राजगुरुनगर सहकारी बँकच्या मुख्य कार्यालयास भेट** देण्यात आली. एम. ए. अर्थशास्त्र आणि टी. वाय. बी. ए अर्थशास्त्र विषयाच्या विद्यार्थ्यांना बँकिंग क्षेत्रातील अध्ययवत माहिती प्रात्यक्षिक स्वरूपात मिळावी या हेतूसाठी बँक भेटीचे आयोजन करण्यात आले होते.

6) अर्थशास्त्र विभागाच्या वतीने **Economic Forum** ची स्थापना गेल्या अनेक वर्षापासून झालेली आहे Economic Forum अंतर्गत साधारणपणे प्रत्येक महिन्याच्या शनिवारी विद्यार्थ्यांना विविध संकलित केलेल्या माहितीचे सादरीकरण करण्याची संधी दिली जाते. याप्रसंगी विद्यार्थी अर्थव्यवस्थेतील चालू घडामोडींचा मागवा घेतात. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना व्यासपीठावरून आपले विचार मांडण्याची संधी मिळते.

7) **प्रा. सुभाष रणशूर** एस.एन.डी.टी विद्यापीठ पुणे. यांचे **"संशोधन लेख आणि संशोधन प्रकल्प"** या विषयावर टी. वाय. बी. ए च्या विद्यार्थ्यांसाठी **दि. २६/०१/२०२६** व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. प्रा. सुभाष रणशूर यांनी विद्यार्थ्यांना संशोधन लेख आणि प्रकल्प यासंदर्भात सविस्तर असे मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले.

8) अर्थशास्त्र विभागाच्या वतीने एस.वाय. बी.ए. आणि टी.वाय. बी.ए. या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी **"अंदाजपत्रक २०२५–२६"** या विषयावर **परिसंवादाचे आयोजन दि. १०/०२/२०२६** करण्यात आले. या परिसंवादाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना केंद्र सरकारच्या अंदाजपत्रकाची रचना, उद्दिष्टे, तरतुदी आणि त्याचे आर्थिक परिणाम यांची सखोल माहिती देणे हा होता. कार्यक्रमाची सुरुवात स्वागतपर भाषणाने करण्यात आली. परिसंवादाचे आयोजन अर्थशास्त्र विभागातील प्राध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. विद्यार्थ्यांनी सादरीकरण करताना चार्ट, मुद्देसूद माहिती आणि उदाहरणांचा उपयोग करून विषय स्पष्ट केला. परिसंवादादरम्यान विद्यार्थ्यांनी प्रश्न विचारले आणि चर्चेत सक्रिय सहभाग घेतला.

9) अर्थशास्त्र विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांच्या लेखनकौशल्याचा विकास व्हावा तसेच समकालीन आर्थिक घडामोडींची जाणीव निर्माण व्हावी या उद्देशाने **निबंध स्पर्धेचे आयोजन दि.२१/०२/२०२६** करण्यात आले.या स्पर्धेचा विषय **"जागतिक घडामोडींचा भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम"** असा होता. या विषयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावरील आर्थिक, राजकीय आणि सामाजिक बदलांचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर होणारा प्रभाव समजून घेण्याची संधी मिळाली.या स्पर्धेमध्ये टी.वाय. बी.ए. या वर्गातील विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवला. यामध्ये टी.वाय. बी. ए. च्या 13 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

10) अर्थशास्त्र विभागाच्या वतीने एम.ए. वर्गातील विद्यार्थ्यांसाठी **"प्रदूषणाचा पर्यावरणावर होणारा परिणाम"** या विषयाचा अभ्यास करण्यासाठी **क्षेत्रभेटीचे आयोजन दि. २७/०२/२०२६** करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष निरीक्षणाद्वारे पर्यावरणीय समस्यांची जाणीव करून देणे व त्यांचे आर्थिक व सामाजिक परिणाम समजावून सांगणे हा होता. विद्यार्थ्यांनी भीमा नदीच्या काठावर जाऊन पाण्याची स्थिती, प्रदूषणाचे स्रोत आणि

परिसरातील स्वच्छता यांचे निरीक्षण केले. नदीत सांडपाणी, प्लास्टिक कचरा व इतर घनकचरा मिसळत असल्याचे आढळून आले. त्यामुळे पाण्याची गुणवत्ता घटलेली असल्याचे स्पष्ट झाले.

11) **दि.10 मार्च 2026** रोजी अर्थशास्त्र विभागाच्या वतीने महिला दिन निमित्त **काव्यवाचन** स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत एफ.वाय.बी.ए., एस. वाय व टी.वाय.बी.ए आणि एम.ए मधील 12 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यातील कविता वाचन, विषय, सदारीकरण विचारात घेऊन तीन क्रमांक काढण्यात आले. कान्हुरकर वैष्णवी, कोळेकर ऐश्वर्या, सुकाळे साक्षी या विद्यार्थिनींचे क्रमांक आले.

12) अर्थशास्त्र विषयाचे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून ज्ञान मिळावे, तसेच पर्यटन आणि किनारपट्टी भागातील लोकांच्या आर्थिक उपजीविकेची माहिती मिळावी या उद्देशाने अर्थशास्त्र विभागाच्या वतीने **शैक्षणिक सहलीचे** आयोजन **दिनांक १५ मार्च २०२६** रोजी करण्यात आले. ही सहल Murud-Janjira Fort, Ballaleshwar Pali Temple, Kashid Beach आणि Birla Mandir, Salav या पर्यटन व धार्मिक स्थळांना देण्यात आली. या सहलीमध्ये द्वितीय वर्ष व तृतीय वर्ष बी.ए. (अर्थशास्त्र) विभागातील विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवला. एकूण १५ विद्यार्थ्यांनी या सहलीत सहभाग घेतला.

13) **राष्ट्रीय कांदा आणि लसूण संशोधन केंद्र** ही भारतीय कृषी संशोधन केंद्राच्या अंतर्गत असलेली संशोधन संस्था राजगुरुनगर येथे १९९७ साली स्थापन करण्यात आली. या संस्थेत कांदा आणि लसूण या पिकांवर संशोधन केले जाते. संस्थेत कांदा आणि लसूण या पिकांच्या नवनवीन जाती विकसित केल्या जातात, तसेच कांदा आणि लसूण बियाण्यांची विक्रीही केली जाते. या भेटीत विद्यार्थ्यांना कांदा लसूण लागवड तंत्रज्ञान, सुधारित वाण, कीड व्यवस्थापन आणि साठवणुकीच्या आधुनिक पद्धतीची प्रत्यक्ष माहिती मिळाली. प्रयोगशाळा रोपवाटिका आणि प्रात्यक्षिक शेतीची पाहणी करून संशोधनाचे महत्त्व समजले. **दि.27/3/2026** रोजी अर्थाशास्त्र विभागातील 28 विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय कांदा आणि लसूण संशोधन केंद्र, राजगुरुनगर भेट दिली.

14) कला शाखेतील तृतीय वर्ष कला व एम. ए. द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांचा **शुभेच्छा समारंभ दि. 7 एप्रिल 2026** रोजी उत्साहात पार पडला.कला शाखेतील मराठी, इतिहास, भूगोल, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इंग्रजी या सर्व विभागाचा एकत्रित शुभेच्छा कार्यक्रम असल्याने अधिक उत्साही आणि आनंदी वातावरणात सर्व सहभागी झाले. सदर कार्यक्रमात प्रत्येक विभागाती यशस्वी विविध स्पर्धा परीक्षेत यश मिळवणारे, पोलीस झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार संस्थेचे उपाध्यक्ष मा. नानासाहेब टाकळकर यांच्या हस्ते करण्यात आला.

15) **दिनांक 11 एप्रिल 2026** रोजी अर्थशास्त्र विभागाच्या वतीने **"अंदाजपत्रक 2026"** या विषयावर आधारित भित्तीपत्रकाचे अनावरण कार्यक्रम उत्साहात व शिस्तबद्ध वातावरणात पार पडला. या कार्यक्रमात अर्थशास्त्र विभागातील सर्व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला.